**ठळक बातम्या**

- राज्यात थॅलेसिमिया रोगाची चाचणी विवाहाच्यापूर्वी बंधनकारक करण्याची सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची विधानसभेत ग्वाही

- बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये शिष्यवृत्ती तसंच प्रवेशासाठी समान धोरण राबविण्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आश्वासन

- बेदरकारपणे गाडी चालवणाऱ्यांना भरपाई द्यायला वीमा कंपनी बांधिल नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

**आणि**

- वाहतुकदारांचा संप कायम, उद्यापासून जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक बंद करण्याचाही दावा

**<><><><>**

राज्यात थॅलेसिमिया रोगाची चाचणी विवाहाच्या पूर्वी बंधनकारक करण्याची ग्वाही सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी आज विधानसभेत दिली. याबाबतचा प्रश्न विकास ठाकरे यांनी विचारला होता. प्रत्येक जिल्ह्यात या रोगावरची उपचार केंद्र सुरू केली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. कर्करोग निदान वाहन खरेदीत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप काँग्रेसचे विजय वडेट्टीवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी केला. या आरोपांची आरोग्य विभागाच्या आयुक्तांकडून चौकशी केली जात असल्याचं बोर्डीकर सांगितलं. हे अधिवेशन संपण्याआधी या चौकशीचा अहवाल सभागृहात सादर करण्याची सूचना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली.

राज्यात सिटी स्कॅन आणि एम आर आय यंत्रांचा तुटवडा अथवा बंद असलेल्या सर्व ठिकाणी या सुविधा दोन महिन्यात कार्यान्वत करण्याचं आश्वासन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी संजय पोतनीस यांनी विचारलेल्या प्रश्नावर दिलं.

वाळू आणि रेती वाहतुकीसाठी चोवीस तास परवानगी देण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी जीपीएस प्रणाली आणि सीसीटीव्ही कॅमेरा पद्धती लागू केली जाणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत एका निवेदनाद्वारे दिली.

यानुसार आता संध्याकाळी सहा नंतर महाखनिज या पोर्टलवरून वाहतूक परवाना दिला जाईल असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

शैक्षणिक संस्थांच्या परिसरात अंमली पदार्थांची विक्री थांबवण्यासाठी सरकारनं मोठी कारवाई सुरू केली आहे. मुंबईत शाळा-महाविद्यालयांच्या जवळच्या दोन हजारांवर संशयास्पद पानपट्ट्या आणि टपऱ्या हटवण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली. याबाबत सरकारनं मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहीम हाती घेतली आहे.

कृत्रिम अंमली पदार्थ तयार करणं आज सोपं झालं असून ते थांबवण्यासाठी बंद झालेल्या रसायनांच्या कारखान्यांवर धाडी टाकून तिथं अशा प्रकारचं काम पुन्हा सुरू झालेलं नाही ना, याची पडताळणी सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><>

बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये यापुढे विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारावर विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येणार आहे. या संस्थांमधली विद्यार्थ्यांची संख्या, सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रियेबाबत समान धोरण राबविण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल आला आहे. त्यावरुन लवकरच निर्णय घेऊ असं ते म्हणाले.

<><><><>

महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक अधिनियम १९८१ अंतर्गत लाभ अनेक खाजगी सुरक्षा रक्षकांना मिळत नसल्याच्या तक्रारी येत असून या संदर्भात जिल्हानिहाय तपासणी मोहिम राबवण्यात येणार असल्याची माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. खासगी सुरक्षा रक्षकांच्या हक्काबाबत सदस्य जितेंद्र आव्हाड यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

<><><><>

शहरी भागातल्या मुलांच्या कुपोषणाचं प्रमाण ग्रामीण भागातल्या मुलांच्या तुलनेत अधिक वेगानं वाढत आहे. मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, पुणे, धुळे आदी शहरांमध्ये ते

अधिक आहे, अशी माहिती महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी आज विधानसभेत लेखी उत्तरात दिली.

राज्यात ३० हजार ८०० मुलं कुपोषित असून त्यातली २ हजार ८८७ मुंबईतली आहेत. राज्यातल्या एकूण ४८ लाख ५९ हजार ३४६ लहान मुलांच्या वजन आणि उंचीची तपासणी केल्यानंतर त्यातली ३० हजार ८०० मुलं अतिकुपोषित असल्याचं आढळलं असून १ लाख ५१ हजार ६४३ मध्यम कुपोषित असल्याचं या वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या पोषण आकडेवारी वरुन स्पष्ट झालं आहे.

**<><><><>**

मुंबईत ससून डॉक परिसरात अनेक मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांना नोटीसा आल्या आहेत. त्याविषयी बोलताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुंबईला महसूल मिळवून देणाऱ्यांना त्यांच्या मूळ जागेवरून हटवण्याचा प्रयत्न मुंबई पोर्ट ट्रस्टकडून होत असल्याचा आरोप केला.

- **होल्ड बाईट- आदित्य ठाकरे –**

- **<><><><>**

ओबीसी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्यासह कार्यकर्त्यांनी मुंबईत गिरगाव चौपाटीनजीक समुद्रात उतरून आंदोलन केलं.

**<><><><>**

बेदरकारपणे गाडी चालवणाऱ्यांसाठी विमा कंपनी भरपाई द्यायला बांधील नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या प्रकरणात याचिकाकर्त्या कुटुंबाने गाडीचा टायर फुटून अपघात झाल्याचा दावा केला होता आणि विमा कंपनीकडे ८० लाख रुपयांची भरपाई मागितली होती. मात्र, पोलिसांच्या आरोपपत्रात कुटुंबाच्या प्रमुखानेच बेफिकीरपणे गाडी चालवल्यानं हा अपघात झाल्याचं म्हटलं होतं.

**<><><><>**

कर्जाचा आगाऊ भरणा करणाऱ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी करण्यावर रिझर्व्ह बँकेने निर्बंध लादले आहेत. बिगर व्यावसायिक कर्ज घेणाऱ्यांकडून अशा प्रकारचे शुल्क कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्थेने घेऊ नये असं रिझर्व्ह बँकेने म्हटलं आहे. येत्या आर्थिक वर्षापासून यासंदर्भातले दिशा निर्देश लागू होणार आहेत. सरकारी आणि खासगी

बँका, सहकारी बँका, गैर बँकिंग वित्तीय संस्था यांना हे दिशानिर्देश लागू होतील. कर्जाचा पूर्ण किंवा अंशतः भरणा केला तरी तसंच कुठल्याही किमान कालावधीच्या अटीशिवाय हे दिशा निर्देश लागू होतील. ज्या कर्जांना हे दिशा निर्देश लागू होणार नाही, त्या कर्जाच्या मंजुरी पत्रात याचा स्पष्ट उल्लेख करण्याचे आणि शुल्काची रक्कम लिहिण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेने दिले आहेत.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आजपासून दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर येत आहेत. थोरले बाजीराव पेशवे यांचा अश्वारूढ पुतळा खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या परिसरातील त्रिशक्ती प्रवेशद्वारावर उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचं अनावरण अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर शहा राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील छात्र आणि सैन्याधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

**<><><><>**

वाहतूक पोलिसांकडून होत असलेली अन्यायकारक दंड वसुली आणि ई चलनावर लावलेलं दंड माफ करण्यासह इतर मागण्यांसाठी नवी मुंबईतल्या वाहतूकदारांनी १ जुलैपासून बेमुदत संप पुकारला आहे. आपल्या मागण्या मान्य झाल्याशिवाय संप मागे घेणार नसल्याचा निर्धार आज त्यांनी नवी मुंबईत पत्रकार परिषदेत व्यक्त केला. उद्यापासून हा संप अधिक तीव्र करण्यात येणार असून अत्यावश्यक सेवांची वाहतूकही थांबवण्यात येणार असल्याचं समितीनं आज म्हटलं आहे.

**<><><><>**

आषाढी वारीसाठी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचं आज पंढपूर तालुक्यात आगमन झालं. त्यापूर्वी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचं ठाकूर बुवा समाधी इथं नेत्रदीपक गोल रिंगण झालं. माळशिरस तालुक्याच्या हद्दीत जेष्ठ बंधू सोपानदेव महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखीची भेट झाली. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी वारीसाठी पंढरपूर शहर आणि परिसरात प्रशासनाने केलेल्या सुविधांची पाहणी केली.

**//<><><><>//**